संक्षिप्त फौजदारी खटला क्र. १२७/२०२२.                                        निशाणी क्र. ३२

फिर्यादी पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक -१

मी सत्यप्रतिज्ञेवर निवेदन करतो की,

माझे नांव - संजय रामकृष्ण काची

वय - ४४ वर्षे, धंदा - नोकरी

रा. -दापोडी, पुणे.

**<u>सरतपासणी फिर्यादी पक्षातर्फे एस.वाय पाटील विधिज्ञ</u>**

मी, माझी पत्नी व मुलांसोबत घर नंबर १६७, एसटी रोड, गंगा मेडीकलचे वर दापोडी येथे राहतो. माझ्या पत्नीचे नाव वनीता काची आहे. आरोपी क्र १ माझा मोठा भाऊ असून आरोपी क्र २ ही त्याची पत्नी आहे. दोन्ही आरोपी आमचे शेजारी राहतात. माझे वडील १६-७-२०१७ रोजी मयत झाले असून आइ्र २०-४-२०२१ रोजी मयत झाली आहे. दापोडी येथील सव्र्हे नं. २/७ब व सव्र्हे नं. ७७/५अ /१ब या दोन्ही मिळकती आरोपी व माझ्या नावावर आहेत. सदर मिळकतीत माझा अर्धा हिस्सा आहे. आरोपी व माझ्यात सदर मिळकतींचे अद्याप वाटप झालेले नाही. दिनांक १-६-२०२१ रोजी दुपारी १२.३० च्या सुमारास दोन्ही आरोपींनी माझ्या घराजवळ येवून मला शिवीगाळ करुन मारहाण केली. सदर वाद मिळकतीवरुन व मी माझा हिस्सा सोडून दयावा म्हणून झाला. आरोपींनी मला धमकी दिली की, प्रॉपर्टीबाबत पुन्हा विचारले तर जीवे मारील. मी घटनेच्या दिवशी सदर घटनेची भोसरी पोलीस स्टेशनला तक्रार दिली. तक्रारीची प्रत प्रकरणात नि. ३० वर दाखल केली आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर असून त्यावर माझी सही आहे. दिनांक २८-७-२०२१ रोजी दुपारी १२.३० च्या सुमारास मी व माझी पत्नी घरी असताना दोन्ही आरोपी आमचे घराजवळ आले व आम्हांला शिवीगाळ करु लागले. मी त्याबाबत भोसरी पोलीस स्टेशनला अदखलपात्र गुन्हा नोंदवला. त्या तक्रारीत प्रत नि. ३१ वर दाखल आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर असून त्यावर माझ्या पत्नीची सही आहे. मी पुन्हा सांगतो की,नि. ३१ ची तक्रार माझ्या पत्नीने दिली होती.

२. दिनांक ४-९-२०२१ रोजी दुपारी १.३०च्या सुमारास दोन्ही आरोपी आमचे घराजवळ आले. मला त्यांनी ' निच, हरामखोर, भाडखाव, नालायक अशी शिवीगाळ केली. ते मला ' तू अगोदर घर खाली कर, नोटीस का पाठविली असे म्हणून आरोपी क्र १ याने माझ्या नाकावर ठोसा मारला, त्याने दुसरा ठोसा तोंडावर मारला त्यामुळे माझ्या नाकातून व तोंडातून रक्त आले. माझी पत्नी मला वाचवण्यासाठी पुढे आली असता, आरोपी क्र १ ने ' तुला माज आला आहे, तुझी आज इज्जत ठेवत नाही असे म्हणून माझ्या पत्नीची साडी ओढू लागला. माझ्या पत्नीने प्रतिकार केला असता दोन्ही आरोपींनी माझ्या पत्नीला व मला लाथाबुक्यांनी मारहाण करायला सुरुवात केली. त्यांनी खूप घाण ' झवाडे, रांड अशी शिवीगाळ केली. आरोपी क्र १ ने माझ्या पत्नीचे केस धरुन ओढले व तिचा विनयभंग करण्याचा प्रयत्न केला. आम्हांला मारहाण झाल्यामुळे मी चक्कर येवून खाली पडलो. माझ्या पत्नीने कसेबसे मला सावरुन उपचारासाठी वायसीएम हॉस्पीटल येथे दाखल

केले.  आम्ही भोसरी पोलीस स्टेशनला तक्रार दाखल केली परंतू त्यांनी दखल घेतली नाही, म्हणून मी हे प्रकरण दाखल केले. मी हॉस्पीटलचे उपचारासंबंधी कागदपत्रे दाखल केली आहेत.

उलटतपास आरोपी तर्फे श्री.आर एच साळुंखे    विधीज्ञ

३.        मी प्रस्तुतचे प्रकरण २०२१ ला दाखल केले.  सदर फिर्याद वाचून मी त्यावर सही केली. मी पिंपरी न्यायालयात मिळकतीबाबत आरोपींविरुध्द दावा दाखल केला आहे. त्या दाव्यात तात्पुरता मनाईचा अर्ज दाखल केला आहे, तो अर्ज सध्या प्रलंबित आहे. सदर अर्ज फेटाळल्यामुळे मी अपिल दाखल केले आहे. त्या प्रकरणात मिळकतीवर रिसीव्हर नेमावा म्हणून मी अर्ज केला आहे. तो अर्ज फेटाळण्यात आला आहे.  माझ्या फिर्यादमध्ये माझा धंदा व्यवसाय असा लिहला आहे. त्यावेळी मी शेती करत होतो. आमची पंढरपूर येथे शेती आहे. मी दापोडी येथून येवून जावून शेती करत होतो.

४.      माझ्या आईने माझ्याविरुध्द दोन वेळा भोसरी पोलीस स्टेशनला तक्रार दिली होती काय मला आठवत नाही. बोलेरो वाहन माझ्या वडीलांचे नावे होते.  २०१७ मध्ये ते वाहन माझ्या नावावर झाले. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या आइने बोलेरो वाहन चोरी केल्याबाबत माझ्याविरुध्द भोसरी पोलीस स्टेशनला तक्रार दाखल केली होती. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक २५-१-२००८ रोजी मी आरोपी क्र १ च्या नावे सरतपासात नमूद केलेल्या दोन्ही मिळकतीबाबत हक्कसोडपत्र करुन दिले होते. साक्षीदार सांगतो की, सदर हक्कसोडपत्र वडीलांचे नावे करुन दिले होते.  सदर हक्कसोडपत्र नोंदणीकृत केले होते. दिनांक १-६-२०२१ रोजीचे घटनेबाबत मी त्याच दिवशी दुपारी २ ते ३ च्या दरम्यान तक्रार दिली होती. तक्रार देताना माझ्यासोबत माझी पत्नी होती. इतर कोणी आमचेसोबत नव्हते. त्यावेळी आम्ही बसने भोसरीला गेलो होतो. घटनेच्यावेळी  आरडाओरड झाला होता. आमचे घराजवळ मुख्य रस्ता असून तो वर्दळीचा आहे.

५.      दिनांक ४-९-२०२१च्या घटनेनंतर मी व माझी पत्नी रिक्षाने भोसरी पोलीस स्टेशनला गेलो. मी त्यादिवशी पहिल्यांदा २.३० ते ३.०० च्या सुमारास दवाखान्यात गेलो. दवाखान्यात २-४ तास गेले. तेथे डॉ. नी  मला तपासून औषधोपचार केले, एक्सरे काढला. मी तेथे थोडावेळ पडून होतो.  ४-९-२०२१ ची घटना तळमजल्यावर आरोपीच्या मेडीकल समोर घडली. मेडीकलसमोर एक झाड आहे. हे म्हणणे खरे नाही की, मला दारुचे व्यसन आहे.  हे म्हणणे खरे नाही की, दारुच्या नशेत मी झाडाला धडकून खाली पडलो त्यामुळे मला दुखापत झाली.  हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपींविरुध्द खोटी तक्रार दाखल केली. हे म्हणणे खरे नाही की, मला आरोपींनी शिवीगाळ व मारहाण केली नाही.

उलटतपास संपला.

श्रवणोत्तर  स्विकृत

दिनांक –  २८-०३-२०२३

(जी.आर.तिवारी )
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
खडकी, पुणे